माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.११९८, १२००/२४/त.क्र.४४, ४५/२५

श्री.मेहुल मनीलाल हरीआ

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-२१)
४ था मजला, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (नवि-२१)
४ था मजला, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २३.०९.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रार आज दि.२३.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार, विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असून विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणी मूळ द्वितीय अपिल क्र.५७५२ यात अपिलार्थी श्री.हरीआ यांनी दाखल केलेल्या दि.२६.०८.२०२४ रोजी तत्कालिन मा.मुख्य माहिती आयुक्त यांनी आदेश पारित केले असून ते खालीलप्रमाणे आहेत :-

जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता टी विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी अपिलार्थीने जोडपत्र अ मध्ये मागणी केलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस तारीख व वेह निश्चित करुन ई-मेल आय.डी. वर नोंदणीकृत टपालाने लेखी सूचना पाठविण्यात यावी. त्यानंतर माहितीचे अवलोकन देवून, अवलोकनअंती त्यांनी हवी असलेली मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस त्याच दिवशी व्यक्तीश: विनामूल्य देण्यात यावी. तसेच जी माहिती उपलब्ध होत नाही त्याबाबतचे स्पष्ट कारण नमूद करुन अपिलार्थीस लेखी स्वरुपात कळविण्यात यावे.

तसेच हीच माहिती अपिलार्थींनी दाखल केलेल्या द्वितीय अपिल क्र.०००८०१ यात बृहन्मुंबई खंडपीठासमोर देखील दाखल करण्यात आली होती व त्यावर नुकतीच दि.२२.०८.२०२५ रोजी मा.आयुक्त यांनी त्या संदर्भात आदेश देखिल पारित केलेले आहेत. उपरोक्त प्रकरण हे मूळात बृहन्मुंबई खंडपीठासमोर

Jyotsna

दाखल करणे अपेक्षित असून या संदर्भात उपरोक्त दोन्ही प्रकरणात आज मुख्यालयात सुनावणीस आले असून यात ज्यांना माहिती प्रदान करण्याचे आदेश देण्यात आले आहेत ते तत्कालिन जन माहिती अधिकारी एस.आर.ए. झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण यांनी उपरोक्त आदेश प्राप्त होताच दि.११ नोव्हेंबर, २०२४ रोजी अपिलार्थींना लेखी प्रतिसाद दिला असून कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आली असल्याचा दावा केला आहे. तथापि, दिलेला प्रतिसाद हा आदेशाशी विसंगत असून वस्तुस्थितीशी देखिल विसंगत असल्याचा आरोप करीत अपिलार्थी श्री.हरीआ यांनी उपरोक्त तक्रार अर्ज कलम १८ (१) अन्वये दाखल केलेला आहे.

यामध्ये श्री.सचिन गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता टी विभाग, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण यांनी त्यांचा लेखी खुलासा सादर केल्याचे प्रथम दर्शनी आढळून येत नाही. ही बाब लक्षात घेता श्री.सचिन गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता टी विभाग, यांनी कलम २० (१) अन्वये त्यांचा लेखी खुलासा २ आठवडयात सादर करावा त्यानंतर यावर पुढील सुनावणी घेण्यात येईल. उपरोक्त खुलासाची एक प्रत ही अपिलार्थींना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल वर पाठविण्यात यावी.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. उपरोक्त तक्रार अर्जावरील पुर्नसुनावणीस अपिलार्थी, विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उपस्थित रहावे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २३.०९.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra

Jyotsna